म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १४२५
१०५८
REFBK-0010045
REFBK-0010045



# नवोढा

सौ. ललिता-गौरी
एम्.ए.

# न वो ढा

REFBK-0010045
REFBK-0010045

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम ...................... दि: ......................
क्रमांक ...................... नों: दि: ......................

·कवयित्रि :--

## सौ. ललिता-गौरी

एम्. ए.

किंमत २ रुपये

मुद्रक
जी. आर. तेंडोलकर
तरुण भारत प्रेस, बेळगांव.

आवृत्ति पहिली
ऑक्टोबर १९५८

--: सर्व हक्क स्वाधीन :--

प्रकाशिका :--
सौ. ललिता-गौरी देशपांडे
एम्. ए.
यशोवर्धन प्रकाशन
भांदुर-गल्ली
बेळगांव.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| (१) | लोण | १ |
| (२) | खुबी | ४ |
| (३) | तुम्हींही आठवा-चांदणेंच | ७ |
| ( ) | काढीन वचपा | १० |
| (५) | घ्या हो कौल | १२ |
| (६) | यशोदेचा पान्हा | १४ |
| (७) | विचारतें जाब | १६ |
| (८) | अंतःचक्षू | १९ |
| (९) | वहिनीचा दुवा | २१ |
| (१०) | माना सुख | २४ |
| (११) | उगवेल तिथें | २६ |
| (१२) | रस्सीखेंच | २९ |
| (१३) | नको तिळमात्र पूर्वग्रह | ३१ |
| (१४) | बालमुनि | ३४ |
| (१५) | रेशमी हें जाळें | ३७ |
| (१६) | शासन | ४० |
| (१७) | नोंदुनि कुणीही ठेवीना हो | ४३ |
| (१८) | भोळें मन | ४५ |
| (१९) | धास्ती | ४७ |
| (२०) | फसवणूक | ४९ |
| (२१) | कदाचित् | ५१ |
| (२२) | उगवतां बालरवि | ५३ |

| | | |
|---|---|---|
| (२३) | मर्मस्थळ | ५५ |
| (२४) | धीर | ५७ |
| (२५) | सासरचें पाणी | ५९ |
| (२६) | इकडची स्वारी | ६१ |
| (२७) | कानगोष्ट | ६३ |
| (२८) | बोले स्वारी | ६४ |
| (२९) | कवळुनी उरीं मला | ६७ |
| (३०) | सुफलित | ६९ |
| (३१) | चिलखत | ७१ |
| (३२) | सासुरवास | ७४ |
| (३३) | महिमा वर्णाया | ७६ |
| (३४) | वारेमाप | ७८ |
| (३५) | पहिला वहिला अनुभव | ७९ |
| (३६) | तापलेलें रक्त | ८१ |
| (३७) | होई भास | ८३ |
| (३८) | अशा भाग्यासाठीं | ८५ |
| (३९) | भरलेल्या घरीं | ८८ |
| (४०) | अमृताची वाणी | ९१ |
| (४१) | पर्याय | ९४ |
| (४२) | असें हवें घर | ९६ |
| (४३) | असें नको घर | ९८ |
| (४४) | असें घर माझें | १०० |
| (४५) | सासरची दौलत | १०२ |

## अर्पण पत्रिका

प्राणप्रिय पतिराण्यास ... ... ... ...

लग्नाच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त

**स प्रेम भेट**

ता. १३ सप्टेंबर १९५८

बेळगांव.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम १ २८४१३ विः ३०८५
क्रमांक १४२५ नोंः दिः ७-२-

## लोण

नका सासूबाई
नका म्हणूं कधीं
हवी होती सून
वेंधळीशी

नका मामंजी हो
नका म्हणूं तुम्हीं
हवी होती सून
बावळीशी

नका नका तुम्हीं
नका मानूं कधीं
तुमचा पुत्र मी
जिंकियला

घेतें एका करें
देतें दुज्या हस्तें
दामदुप्पट हो
फेड माझी

पितापुत्रा मध्यें
मायलेका मध्यें
नाहीं पाडणार
फूट कधीं

नका नका म्हणूं
दुरावला पुत्र
लाभली हो कन्या
तुम्हां नवी

ग्रंथालय
१००८६
शाखा स्थळ

# खुबी

मामंजी हो तुम्हां
सासूबाईंनाहीं
हवी होती सून
वेंधळीशी

वेंधळीशी सून
सुपुत्र मुठींत
शांति समाधान
वृद्धपणीं

असा चुकीचा हो
हिशोब तुमचा
नाहीं तुम्हां ठावें
एक गूज

ममतेचें धन
खुबी त्याची अशी
कंजूषाचें होई
भूमीगत

कंजूषाचें व्हावें
अदृश्य तें द्रव्य
आणि दात्याचें हो
शतपट

तुमचा सुपुत्र
मिठीमध्यें माझ्या
विकासलें त्याचें
व्यक्तिमत्व

ममताही मोठी
विकसित मनीं
तुमचें आसन
उंचावलें

नका नका म्हणूं
दुरावला पुत्र
अधिक निकट
पातलाहे

वेंधळीशी सून
पुत्र असंतुष्ट
तुमची हो माया
पुरेना त्या

नावडती पत्नी
रडवेली सून
बनवी स्मशान
घराचेंही

आवडती कांता
प्रफुल्लित स्नुषा
झालें घरदार
सुवर्णाचें

घरदार सारें
सुवर्णाचें आतां
समृद्ध भांडार
ममतेचें

६

कळली ना तुम्हां ?
ममतेची जादू
वात्याचा खजिना
भरलेला

ता. ३०-६-१९५८

# तुम्हींही आठवा चांदणेंच

कां हो अशा वन्सं ?
उडवितां नाक
बहिणीची माया
कुठवरी ?

रमलां पुरत्या
अपुल्या संसारीं
बीजेला तरी का
येते याद ?

नवी नवलाई
अमुची हो आतां
तिथें तुमची का
उठाठेव ?

नको तुमचे ते
अनुभवी बोल
जादूची पोतडी
अम्हां हातीं

बघूं उघडुनी
आमुची आम्हींच
चिजा आंतमध्यें
अजब त्या

कां हो जाऊबाई
अशी आंठी भालीं
तुमचे ते दिन
आठवा ना

आज भुईवरी
जरि पाय स्थिर
होतां कधींतरी
चंद्रावरी

चांदण्याची रात
चांदण्याचे हात
चांदणेंच भर
दुपारींही

अशी चांदण्याची
दुनिया ती न्यारी
पाहिली ना तुम्हीं
कधींतरी ?

आजचें चांदणें
उद्यांची दुपार
आणि सायंकाळ
टळेना हो

आहे आहे ठावें
रहाटगाडगें
नका देऊं तुम्हीं
जाणीव हो

पाहूं सारें आम्हीं
आमच्याच डोळां
तुमचे निःश्वास
नको आज

९

चांदण्याची हवा
आमुची आजची
नका ना दूषवूं
तुम्हीं कुणीं

नको डागळाया
मधु–चंद्र आज
तुम्हींही आठवा
चांदणेंच

या हो जाऊबाई
या हो तुम्ही वन्सं
चांदण्याचें हंसूं
घेऊनी या

घडीभर व्हा ग
तुम्हीं पुन्हा नव्या
हंसा मनसोक्त
आम्हांसवें

ता. ३०–६–५८

# काढीन वचपा

कां हो भावोजी हें ?
आंबलेलें तोंड
वाटे का वहिनी
अनाहूत ?

तुमचीही उद्यां
उगवेल उषा
उगाच कां असा
दुस्वास हो

आठवा ना मनीं
भोळा लक्ष्मण
प्रेमळ वहिनी
सीतामाई

भोळ्या माझ्या मनीं
सीतेची हो माया
रेशमी हीं नातीं
लवचिक

नव्यानेंच जरी
जुळती हीं नातीं
चिवट तीं नाहीं
तुटायचीं

निघेना का पुरी ?
मनांतली अढी
काढीन वचपा
योग्य वेळीं

नवी बुजरीशी
येतां जाऊबाई
करीन हो तिला
सळोपळो

आतां कुठें गेली ?
भालींची ती आंठी
दडविण्या हंसूं
पळतां कां ?

ता. ३०–६–५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४४७३ वि: ८१.२१
क्रमांक १८२५ नों दि ८-२-५९

# घ्या हो कौल

रुचलें ना तुम्हां
माझें आगमन
चिमण्या बाळांचा
घ्या हो कौल

पुसा सासूबाई
धाकुट्या वन्संना
आवडे का नवी
वहिनी ही ?

पुसा जाऊबाई
बाळाला हो छोट्या
कशी काकू नवी
वाटे त्याला

चिमण्या बाळांचीं
निर्मल हृदयें
झेपावती कां हो
माझ्याकडे ?

पुसा मोठ्या वन्सं
छबीला तुमच्या
मामीवर नव्या
भाळली कां ?

चिमणे हे हात
पाठीशीं जोंवरी
उपेक्षा तुमची
जाणवेना

चिमण्या बाळांचा
मधुर गोंगाट
विरलीं त्यांतच
अभ्रें सारीं

उमजलें जें ह्या
निरागस बाळां
समजेल तुम्हां
पुढें मागें

ता. ३०-६-५८

# यशोदेचा पान्हा

सासूबाई तुम्हीं
आवरावी जीभ
पुत्राची तुमच्या
आण तुम्हां

चुकवुनी डोळा
खाऊ खाई बाळ
त्याचा कधीं राग
मानाल का ?

गोकुळींचा कान्हा
चोरे तूप लोणी
पाही यशोदाही
कवतुकें

तीच वत्सलता
द्या हो आम्हांलाही
शद्बांचें ताडन
नको फुका

पहा निरखुनी
आमुच्या डोळ्यांत
निर्मल मनाचें
प्रतिबिंब

बालमुखीं पाही
यशोदा ब्रम्हांड
तोच चमत्कार
आज पुन्हा

पतिराणा माझा
अवतारी कृष्ण
नका मानूं त्याला
सान भोळा

कृष्णरुपी शिव
मीच आदिशक्ति
स्वयंभू मीलन
दोघांचेंही

सहजीं घडतां
दिव्य साक्षात्कार
यशोदेचा पान्हा
तुम्हांलाही

ता. ६-७-५८

# विचारतें जाब

भावजी हो तुम्हीं
गाजवूं नका ना
अशी वडीलकी
फुकाफुकीं

पाहियले चार
पावसाळे जास्त
म्हणुनी का डोस ?
पाजतां हे

तुमचीच वाट
चोखाळतां आम्हीं
आज कां वांकुडी ?
वाटावी हो

तुमचाच धडा
गिरविला आम्हीं
चुकीचा कां अर्थ ?
लावतां हो

पतिराणा माझा
तुम्हांहुनी सान
परि अवमान
करूं नका

भावाचे तुमच्या
होतां चार हात
पूर्ण पुरुष त्या
मानावें हो

नको करायाला
तुम्हीं उपदेश
आहे त्याची सखी
चतुरशी

शिणतां कां फुका
दाखवाया मार्ग
आहे ना वाटाडया ?
मीच खरी

रहा विसंबून
पुरे माझ्यावरी
नाहीं कधीं दिशा
चुकायची

प्रगतीची दिशा
उन्नतीचा मार्ग
प्रणयाचें गीत
आमुचें हो

कां हो धुमसतां ?
सहजीं दावितां
असा अविश्वास
माझ्यावरी

अजुनी का वाटे ?
अबलाच आम्हीं
पटेना का नारी
आदिशक्ति !

थांबा भावजी हो
जाऊनियां आंत
जाऊबाईंनाही
          विचारतें

विचारतें जाब
इतुक्या वर्षांत
कां नाहीं चमक
          दाखविली ?

ता. ८–७–५८

# अंतःचक्षू

सासूबाई तुम्ही
लाडक्या लेकाला
वेडेंसें कोंकरूं
मानूं नका

चालेना तें कधीं
नीट कळपांत
म्हणुनियां कान
पिळूं नका

चुकवुनी डोळा
पळूं नये त्यानें
म्हणुनी बांधून
ठेवूं नका

स्वीकारतां मला
अग्नीच्या साक्षीनें
फुटले हो पंख
दिव्य त्याला

फुटले हो पंख
दिव्य तेजोमय
उडूं द्यावें त्याला
स्वच्छंदानें

अशा अलौकिक
पंखांची किमया
आईच्या मायेला
पटेना हो

## २०

वाटे अजुनीही
भोळ्या ममतेला
कोंकरूं तें स्वयें
सांभाळावें

करा करा आतां
पाश थोडे ढिले
पहा घडे मग
चमत्कार

घेऊनियां झेप
भव्य गरुडाची
घालील गगना
गवसणी

सामर्थ्य हें असें
तुमच्या पुत्राचें
कळेना हो तुम्हां
सांगूनीही

असे अंतःचक्षू
लाभती पत्नीला
नाहीं नाहीं आणि
दुजा कुणा

त्रिकालज्ञानी मी
पतिव्रता गुणी
मानावे प्रमाण
माझे शब्द

ता. ९-७-५८

# वहिनीचा दुवा

अहो गोऱ्या वन्सं
नका ठेवूं असें
जहाल जहर
जिव्हेवरी

रंग गोरा पान
बदामी लोचन
सारा नीक झोंक
'ह्यां' च्या परी

अमृताची वाणी
आर्जवी मंजुळ
शिका ना तुम्हींही
'ह्यां' च्या कडे

लाघव मार्दव
सौजन्य सौहार्द
उपजत गुण
स्त्रियांचे हे

अहो गोऱ्या वन्सं
नका ना विसरूं
नारीधर्म असा
वैनीपुढें

इथें माहेरीं हो
वन्सं तुम्हीं माझ्या
घरीं वहिनीही
असाल ना ?

असतील ना हो
तुमच्याही घरीं
छोट्या मोठ्या वन्सं
छळणाऱ्या ?

छोट्या मोठ्या वन्सं
बोलती टाकुनी
आणि वहिनी ती
दीनवाणी

आठवा ना सारें
ह्याच घटकेला
आणि आवरा ना
जीभ जरा

अहो गोऱ्या वन्सं
नका नका ठेवूं
असें काळेंबेरें
मनामध्यें

सुपापरी मोठें
मन माझें भोळें
नाहीं कधीं डंख
धरणार

हंसुनी घालवा
चारच दिवस
माहेरपणाचे
वन्सं तुम्हीं

बोलतांना गोड
वहिनीचा दुवा
तारील तुम्हांला
सासरींही !

ता. ९-७-५८

# माना सुख

कां हो मोठ्या वन्सं ?
बाळगितां गर्व
खेळविलें 'ह्यां' ना
बाळपणीं

कळलें ना तुम्हां
इतुक्या वर्षांत
पारखिलें मी हो
निमिषार्धी

उमजलें नाहीं
तुम्हां चुकुनीही
वाढविला छावा
सिंहाचा हो

पराक्रमी शूर
सिंहाचें कातडें
ओळखावें झणिं
सिंहीणीनें

सिंहिणीचें रक्त
पाहुनियां माझें
बिचकतां तुम्हीं
सारेजण

नाहीं नाहीं परि
समजलें तुम्हां
सिंहाचाच छावा
तुमचाही

सिंहाचाच छावा
भुले सिंहिणीला
कां हो तुमचा हा ?
थरकांप

हवी होती तुम्हां
गरीबशी शेळी
झेलायला शब्द
वन्संचेही

अहो मोठया वन्सं
ठेवा ध्यानामध्यें
सिंहिणीला वैरी
नाहीं कुणीं

शेळीची लीनता
दुर्बलांची ढाल
नाहीं रुचायची
बुद्धीवंतां

बुद्धीवान गुणी
तुमचा हो भाऊ
पतिराणा माझा
धोरणी तो

हेरिली हो त्यानें
पत्नी अनुरूप
तुम्हींही त्यांतच
माना सुख

ता. ९-७-५८

# उगवेल तिथें

सासूबाई तुम्हीं
बोलावें जपून
तुमच्याही लेकी
आठवून

विसरुनी सारा
गोतावळा जुना
झटतों तुम्हांला
सुखवाया

आवरतों हौस
मारुनियां मन
तुमची प्रशंसा
मिळवाया

तुमच्याही लेकी
पतिगृहीं अशा
नमतात सदा
सासूपुढें

कन्या लाडक्याही
परक्याचें धन
घोकतों हो आम्हीं
माहेरींही

पढवितों मना
अशी सोशिकता
ढळेना जी कधीं
वादळांत

नाहीं विचलित
झंझावातानेंही
म्हणुनी फायदा
घेऊं नका

राखावी आमुची
तुम्हीं बूज योग्य
लेकीपरी आम्हां
मानुनियां

नका म्हणूं कधीं
माझ्या लेकी आतां
दृढमूल झाल्या
संसारांत

सासूचें वर्चस्व
सुनेचे उसासे
नाहीं कधीं त्याला
अंत मुळीं

आणि सासूबाई
पहा चिमण्या ह्या
सुकुमार छोट्या
वन्सं माझ्या

कोंवळया ह्या कन्या
उद्यां पतिगृहीं
रमतिल कशा ?
पहा तुम्हीं

चिमण्यांची ताई
माना तुम्हीं मला
घालून पाडून
बोलूं नका

पेराल जें इथें
उगवेल तिथें
तुमच्या लेकींच्या
सासरीं हो

ता· ९–७–१९५८

# रस्सीखेंच

नका मामंजी हो
नका करूं माझी
अशी रस्सीखेंच
तुम्हांमध्यें

पतिराणा माझा
तुमचा सुपुत्र
चालतो दौडीनें
भर वेगें

भरधांव चाल
उमद्या अश्वाची
तुम्हां मागोमाग
जाववेना

जाववेना तुम्हां
त्याच्या मागोमाग
जाणें मला परि
भाग आहे

जातां त्याच्या सवें
नका अडवूं हो
आण आतां तुम्हां
पुत्राचीच

नका नका म्हणूं
उद्धट ही स्नुषा
विसरली सारें
घरदार

आहे एक ठावें .
भोळ्या नारी मना
शिरसावंद्य हो
पति आज्ञा

मानावा संतोष
पति सुखामध्यें
असा पत्नीधर्म
श्रेष्ठ खरा

नका मामंजी हो
नका घालूं गळ
खेंचण्या लगाम
जरा 'ह्यां' चा

सांगायचें जें तें
सांगा तुम्हीं स्वयें
आहे जनकाचा
अधिकार

बोलतां मी 'ह्यां' ना
उलटून कांहीं
महत्पाप मला
लागेल हो

श्रद्धा माझी अशी
निष्ठा माझी अशी
म्हणुनी थांबवा
रस्सीखेंच !

ता. ९-७-५८

# नको तिळमात्र पूर्वग्रह

अग जाऊबाई
तूं मी दोघीजणी
मासोळ्या ग जणूं
पाण्यांतील

हवें ग हिंडाया
ह्याच जलाशयीं
नाहीं कांठावर
यायाचें ग

नको म्हणूं गडे
खारट हें पाणी
आणि माहेरचें
गोडगोड

पहा जाऊबाई
ह्याच जलाशयीं
लाभलीं ग रत्नें
प्रणयाचीं

प्रीती नवरत्नें
उराशीं जोंवरी
अभेद्य आपुलें
सुख सये

नाहीं पुसणार
तुला कधीं गडे
वन्सं भावजींचे
गुणदोष

सासू सासऱ्यांचा
कसा हटवाद
नको करूं मला
सावध ग

निरखीन सारें
माझें मींच सये
नको तिळमात्र
पूर्वग्रह

ठेव ठेव गडे
गुपितें तीं मनीं
येऊं दे मलाच
अनुभव

आहे गडे ठावें
बोंचणारा सल
एकच दोघींचा
असायचा

कुठें कांटेकुट
खांच गळगे ते
कळले ग तुला
सरावानें

नको नको परि
नको गडे सांगूं
चिंतेनेंच धीर
खचायचा

नवोढा मी भोळी
हंसतें सुखानें
हंसूं दे ग मला
          मनसोक्त

ता. १०-७-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप[illegible]
अनुक्रम २५४१३ वि: ३।-२१
क्रमांक १४२५ नों: दि: ७-२-५[illegible]

# बालमुनी

मोठ्या वत्सांचा हा
छोटा छोटा बाळ
लाभे जानी दोस्त
नवा मला

पुसेना तो कांहीं
सांगेना तो कांहीं
वाजवुनी टाळ्या
हंसे सदा

नवोढेचें भोळें
मन हळुवार
साधासा शब्दही
खुपे तिला

वत्संपाशीं लागे
भांड्याला तें भांडें
आणि उगाचच
खिन्न मीही

उणादुणा शब्द
जातां तोंडांतून
पस्तावा मागून
करायचा

अशा वेळीं वाटे
बाळापरि मीही
रहावे मूक हो
तिन्ही काळीं

सान निरागस
बाळाचें तें मन
हंसवितां हंसे
निमिषार्धीं

गालगुच्चा हळु
घेतां मुसमुसे
विसरतो दुजा
क्षणींच तें

असें क्षमाशील
उदार अंतर
तान्हया बाळापरि
हवें मला

नव्या नवरीचें
हळवें हृदय
जुळे बाळाशींच
नातें तिचें

नाहीं भुईवर
पाय माझा स्थिर
तरंगतें जणुं
हवेमध्यें

अशा भावाकुल
नव्या वधूला हो
वाटतात नातीं
डोईजड

मोठ्या वन्संच्या ह्या
छोट्या बाळाकडे
पहातां हलका
शीणभार

आहे साक्षीदार
छोटासा गंभीर
वन्संपाशीं गुज
खोलतांना

ऐकतां गुपित
वन्सं लालेलाल
स्थितप्रज्ञ त्यांचे
बालराजे

अहो मोठ्या वन्सं
कटीवरी शोभे
बालमुनि छोटा
तुमचा हो

शांति दीप्ति त्याची
घ्यावी तुम्हीं आम्हीं
नवीं नातीं दृढ
करूं या हो !

ता. ११-७-५८

# रेशमी हें जाळें

वन्सं भावजी हो
तुम्हां सर्वांनाही
हवी होती वैनी
अनोळखी

अनोळखी पोर
आणतांना घरीं
नाचेल तुमच्या
तालावरी

अनोळखी पोर
वाटेल साजरी
जैसे दुरून ते
डोंगर हो

अशी मनीषा ती
तुम्हां सर्वांचीही
नाहीं पुरविली
भावानें हो

पुसलें ना तुम्हां
कथिलें ना तुम्हां
अवचित बांधे
लग्नगांठ

असा चतुर तो
भाऊ तुमचा हो
प्राणप्रिय माझा
पतिराणा

नका नका रुसूं
तुम्हीं कुणीं आतां
हंसुनी स्वीकारा
नवें नातें

जुन्या ओळखीला
उजाळा तो नवा
लाभतां कृतार्थ
व्हावें मनीं

हंसलो कितीदां
मोकळ्या मनानें
तोच भाव आतां
टिकूं द्या ना

पुऱ्या तपाचा हो
जुना परिचय
त्यावरी पताका
चढे आज

वन्सं भावजी हो
जाऊबाई तुम्हीं
बोलला माझ्याशीं
किती वेळां

स्नेहाच्या त्या जुन्या
धाग्यांचेंच आज
बनलें रेशमी
जाळें नवें

रेशमी हें जाळें
तुटेना तोडुनी
गुंताल हो त्यांत
अधिकच

ता. ११-७-५८

# शासन

अकारण घाव
घालतांना ऊर
जातो दुभंगून
तुमचाच

अनाठायीं वार
करतांना हात
कांपे थरथर
तुमचाच

भोळ्या वैनीवर
घेतां तोंडसुख
ओशाळतें मन
तुमचेंच

स्वीकारुनी सुधा
देतां हलाहल
काजळती हात
तुमचेच

स्फुरतात कर
जिथें वंदायाला
प्रहार तिथेंच
करतां कां ?

पुण्याईचा माझा
उच्च हिमालय
त्यासी वेडावून
दावितां कां ?

उधळितां कटु
मुक्ताफळें इथें
जिव्हा कडवट
तुमच्याच

स्तुतिगान गाया
सांगे सच्चें मन
जागवितां परि
कलीस कां ?

साध्वीवरि अस्त्र
उगारतां तुम्हां
आठवतो मनीं
मंबाजी तो

तुकयाचा छळ
करतांना होई
सर्वांगाचा त्याच्या
दाह तीव्र

तीच व्यथा आतां
तुमच्या वांट्याला
म्हणुनी अंतरीं
व्याकुळ मी

देतें शासन हो
तुमचेंच मन
टोंचुनियां तुम्हां
अविरत

क्षमेचीच माझ्या
संजीवनी आतां
तारिल तुम्हां ह्या
तापामध्यें !

ता. ११-७-५८

# नोंदुनि कुणिही ठेवीना हो

सुवासिनीचें जपतपसाधन
अनादिकाळापासुनि चाले
आणि अशा सति साध्वी साऱ्या
नांवांवांचुनि आल्या गेल्या

प्रिय पतिच्या नांवाचा अविरत
करतांना जप नाहीं शिणल्या
सासुसासऱ्यापुढें वांकुनी
श्रमतांना त्या नाहीं दमल्या

सती अहिल्या द्रौपदि सीता
मंदोदरि तारामती भोळी
अशा पंचकन्या ह्या भूतळीं
कोटी कोटी जन्मुनि गेल्या

कुणीं तयांचें गान गाइना
कुणीं तयांचे गुण वर्णिना
घरोघरीं परि अशा पतिव्रता
होत्या पूर्वी तशाच आजहि

सुवासिनीचें असिधाराव्रत
जाणे केवळ तीच एकटी
सांभाळुनि सासूची मर्जी
पतिवचना तुकवावी मानही

मामंजींचा धाक सदाचा
सासूची ती शिस्त कडकही
दीर नणंदा जावा ह्यांचा
जाचहि गोडच मानायाचा

सुवासिनीचें भाग्य असें हें
जपतपसाधन तिचें असें हें
निमूट सोसुनि घ्यावें सारें
पतिदेवहि ना देति प्रशंसा

पतिदेवहि त्या सुवासिनीचे
गुरफटले बंधुप्रेमार्मांध
भगिनीचेंही येई भरतें
तीर्थरूप तर जनकजननि तीं

दुखावतां त्या महत्पाप तें
बसतें माथीं म्हणे सुपुत्रची
पत्नीचा छळ ब्रीद पतीचें
आचरिलें प्रभु रामानेंही

असा आर्य ललनांचा बाणा
हठयोगच जणुं ऋषीमुनींचा
पतीस दैवत मानुनि त्याचे
प्रहारही हांसुनि झेलावे

सुवासिनीच्या सोशिकतेनें
लाजेना कुणी संकोचेना
सासु सासरे दीरांच्याही
अंगवळणीं तें पडलें सारें

घरोघरीं ह्या अशा पतिव्रता
कुणा कळेना तेज तयांचें
येती जाती नांवें त्यांचीं
नोंदुनि कुणिही ठेवीना हो !

ता. ११-७-१९५८

# भोळें मन

असें माझें भोळें मन
कुणी वाईट दिसेना
ऐटबाज नागराज
ओकी जहर पटेना

असें माझें भोळें मन
भावजीही भावापरि
करतिल माझा द्वेष
शंका स्वप्नींही शिवेना

असें माझें भोळें मन
वन्सं भगिनी समान
मला बघती पाण्यांत
खरें मुळींच वाटेना

असें माझें भोळें मन
सासूबाई माता दुजी
चिंती माझें अनहित
कधीं चुकून म्हणेना

असें माझें भोळें मन
मामंजी ते पितृतुल्य
लोटतिल मला दूर
अशी धास्ती बाळगेना

असें माझें भोळें मन
जाऊबाईंचाही बाळ
मानी काकूस परकी
असा संशय घेईना

असें माझें भोळें मन
एकरूप पतीसवें
जें जें त्यांचें तें तें माझें
मनापासुन घोकतें

असें माझें भोळें मन
सदा माया पसरितें
पाजूं नये दूध सर्पा
कधीं कुणाही सांगेना

उलटेल सर्पराज
माझें मलाही पटेना
तुम्हां वाटे मी नकोशी
मन बिश्वास ठेवीना

ता. १३-७-५८

# धास्ती

पहातें मी घरोघरीं
वन्सं गोड बोलणाऱ्या
उसनें तें अवसान
पाडी घरें माझ्या मना

इथें माझ्या पतिगृहीं
सारें उलटेंच वारें
वन्सं भावजीही सदा
चढ्या स्वरानें बोलती

स्वच्छ सुनावती मला
नाहीं ‘ वहिनी ’ पसंत
पुन्हा पुन्हा सांगतांही
जरा जराही पटेना

घरोघरीं दिसे मला
शुद्ध शद्बांत विखार
आणि इथें उपेक्षाही
उरीं दडवी अमृत

असे निरर्थक शद्ब
कां हो वन्सं तुम्हांपाशीं ?
सायासेंही आवरेना
ममतेचा ओघ कसा ?

खऱ्याखुऱ्या उमाळचाला
कां हो खोटा खोटा बांध ?
झांकल्या कां मोहरा हो
कलहाच्या मृत्तिकेनें

घरोघरीं वन्सं स्नेह
बेगडीच दावितात
आणि इथें खरे होन
कां हो झाले भूमीगत ?

कां हो वृथा धास्ती मनीं
शेफारतां नवी वैनी
दुरावेल बंधु गुणी
आणि अनर्थ माजेल

ओळखलें मनोगत
आतां थांबवा नाटक
हवी हवीशी तुम्हां मी
करा खुशाल कबूल !

ता. –१३–७–५८

# फसवणूक

खोटी खोटी माया
दावी जाऊबाई
गेलें घडीभर
हुरळून

होई कधींतरी
परि गौप्यस्फोट
निराशा दारुण
वांट्याला ती

लटकासा कोप
दाखविती वन्सं
गेलें घडीभर
उन्मळून

अचानक परि
उमटे जिव्हाळा
झालें धन्यधन्य
मनामध्यें

वन्सं जाऊबाई
दोघीही लबाड
फसविती मला
फुकाफुकीं

साधीसुधी जरी
फसगत माझी
उत्तर त्यांतून
निघे एक

सरस मी माझ्या
मोठ्या जावेहुनी
म्हणुनी नाखुष

अजिक्य मी मातें
जिंकितां भावानें
ताठरली मान
वन्संचीही

दडविण्या शल्य
उसनी ती माया

कोप खोटा

ता. १३-७-५८

# कदाचित्

पहा कशी एकली मी
खरी एकली एकली

नाहीं बाजू उचलली

घ्या हो माझी कड जरा
सांगतें ना कधीं ' ह्यां ' ना
पेटलेला आगडोंब
नाहीं तेल ओतणार

सुखाचेंही होतें ओझें
आणि अशा कलहानें
उरीं फाटून हो जातें

भावजी हो वन्सं तुम्हीं
माना बहीण मलाही
एकाकिनी ताईवर
कराल का हल्ला कधीं ?

नवोढा मी नव्या घरीं
खरी एकली एकली
पतीचीही अजुनी ना
पुरी ओळख पटली

तशी पटली ओळख
मानिलें त्या ईशरूप
वन्सं भावजींच्या मनीं
परि सैतान नाचतो

बावरतें त्याच क्षणीं
म्हणतें मी रक्त हेंच,
असेल का खेळत हो
स्वारीच्याही अंगामध्यें ?

आणि उद्यां कदाचित्
बाळ नवाही घेईल
सहीसही सारे दोष
काका आत्या आजींचेही !

ता. १४-७-५८

# उगवतां बालरवि

वन्सं भावजी हो वैर
कुठवर टिकवाल ?
मला परकी परकी
मनाल हो कुठवर ?

बाळ नवा हो येईल
नातें तुम्हांशीं सांगाया
ठेवाल का तेव्हां मला
अशी अलग अलग ?

चिमण्या त्या नव्या जीवा
काय तुम्हीं सुनवाल ?
वाचाल का त्याच्यापुढें
पाढा गृहकलहाचा ?

कोंवळे ते हात थेट
हृदयाला भिडतील
झोंपलेल्या देवालाही
झणि जाग ती येईल

वन्सं भावजींच्या मनीं
आज 'कलि' शिरलेला
उद्यां नव्या बाळानेंच
पिटाळुनी लावायाचा

माना घररिघी मला
म्हणा खुशाल परकी
कवळाल माझ्या बाळा
मीही इथें कृतकृत्य

दिली तुम्हां आजवरी
मायाममता मी भोळी
फेड त्याची कराल ती
घेण्यासाठीं हात छोटे

उगवतां बालरवि
वितळेल निमिषार्धीं
धुकें सारें कलहाचें
ऐक्य-प्रकाश नांदेल

ता. १५-७-५८

अनुक्रम ५५ २६४७२ विः
क्रमांक १४२५ नोंः दिः ७-२-

# मर्म-स्थळ

पतिपत्नीचें हें नातें
अति नाजूक साजूक
नका हेरूं मर्मस्थळ
असें अचूक अचूक

रडवाल तुम्हीं इथें
ढाळिन मी अश्रू तिथें
म्हणतिल 'ते' ही मग
जाऊं सये दुजीकडे

'घरभेदी' म्हणूनियां
त्याच क्षणीं हिणवाल
पुढेंमागें 'ते' ही खास
तुम्हांसाठीं झुरतील

हंसूं क्षणभराचें तें
चिरआसूंना पाचारी
टाळतें हो मोह आज
भय उद्यांचें जाणूनी

भय उद्यांचें जाणूनी
आज आसूं आवरितें
आणि एकलीच मी हो
उरीं फुटूनियां जातें

वन्सं भावजींनीं माझें
हेरियलें मर्मस्थळ
सोशिकशा वृत्तीचा ह्या
कळलाहे त्यांना अर्थ

फळलाहे अर्थ त्यांना
म्हणुनीच जिभा सैल
नाहीं व्हायाचा अनर्थ
आहे खात्री बालंबाल

पतिपत्नीचें हें नातें
अहो नाजूक नाजूक
नका हेरूं वर्म भावजी
मर्म अचूक अचूक !

ता. १५-७-५८

# धीर

वर्सं भावजींचा
सदा फणकारा
निश्चित मी आतां
एकापरी

बोलुनियां गोड
कापाल का गळा
अशी नाहीं भीति
तुम्हांपाशीं

कडू जरी आज
व्हाल उद्यां गोड
करायला आशा
आहे जागा

आज गोड जें तें
उद्यां कदाचित
भ्रमाचा भोपळा
फुटायचा

आघात तो तसा
अधिक असह्य
बरवा त्याहून
आधीं घुस्सा

अभेद्य तें ऐक्य
माझें पतीसवें
तोडायला घाव
माझ्यावरी

आनंदते मनीं
तिकडची स्वारी
आहे पक्की सिद्ध
सहजींच

वाटतें हो तुम्हां
ठिसूळ मी भोळी
म्हणुनी हा हल्ला
माझ्यावरी

सोसतें मी सारें
निमूट हांसत
नयन स्वारीचे
देती धीर

ता. १५-७-५८

# सासरचें पाणी

आधीं होतें बिजली मी
आज जाहलें पणती
आधीं होतें वाघीण मी
आज जाहलें हरिणी

आधीं होतें नागीण मी
आज गरीबशी मुंगी
आधीं होतें चंडोल मी
आतां छोटीशी चिमणी

आधीं होतें बाभूळ मी
आतां जाहलें बकुळी
आधीं होतें निवडुंग
आतां जाहलें तुळस

आधीं होतें झंझावात
आतां मंदशी झुळूक
आधीं होतें मी अंगार
आतां शीतल चंदन

आधीं भरतीची लाट
आतां संथ गंगाजळ
आधीं होतें गिरसप्पा
आतां शांत सरोवर

आधीं होतें मी भास्कर
आतां झालें मधु चंद्र
आधीं होतें रे मी ऊन
आतां झालें रे चांदणें

आधीं होतें हिरकणी
वितळेना कल्पांतींहि
आतां जाहलें रे सोनें
हवी तशी वितळतें

हवी तशी वितळतें
अशी मऊमऊ झालें
पतिसंगें आमूलाग्र
कशी पहा बदललें

माहेरचें वारें तसें
सासरचें पाणी असें
होतें कन्या लाडकी मी
आतां सून लवणारी !

ता. १५-७-५८

# इकडची स्वारी

नका पुसूं कुणी कशीं
सासरचीं माणसें तीं
नाहीं समजत कांहीं
आठवत नाहीं मुळीं

नाहीं आठवत कशा
वन्सं तिखट बोलती
आठवतें एक मात्र
स्वारी हंसते गालांत

हेकेखोर भावजींचा
शद्ध खुपेना हो मना
त्याच क्षणीं स्वारी हळू
स्निग्ध कटाक्ष फेंकते

सासूबाई काढतात
उणें तरी न रुसतें
इकडची स्वारी मला
मूक प्रोत्साहन देते

मामजींचा धाक पुरा
तरीहि ना बावरतें
इकडची स्वारी म्हणे
कर तुला रुचेल तें

सांगतात जाऊबाई
भले बुरे अनुभव
कांहीं शिरेना डोक्यांत
एक स्वारीचाच ध्यास

# बोले स्वारी

पुसतात स्नेही ' ह्यां 'ना
विदुषी ना तुझी भार्या ?
तिच्या गाढ पांडित्याच्या
सुनाव ना कांहीं मौजा

म्हणतात हंसुनी ' हे '
नाहीं कांहीं सांगायला
दहाजणीं सारखीच
गुरफटे संसारांत

दहाजणीं सारखीच
माझ्या अर्ध्या वचनांत
पाळी आज्ञा सासूचीही
सासऱ्याच्या धाकांत ती

दहाजणीं सारखीच
घाबरते वन्सांना ती
देते भावजींना मान
जाऊशींही बोले गोड

दहाजणीं सारखीच
सासरच्या खाई खस्ता
छोट्या वन्सं पुतण्याचे
करी लाड उगाचच

दहाजणीं सारखीच
करीना ती मान वर
इवल्याशा वन्संनाही
उलटुनी बोलेना हो

दहाजणीं सारखीच
घेई सारें सोसुनीयां
विचारतां खोदुनीही
थांगपत्ता लागेना हो

दहाजणीं सारखीच
वाटे सर्वां वरवर
खोल ख़ोल अंतरांत
दिव्य तेजाचा हो लोळ

दहाजणीं सारखी ती
नाहीं दीन दुबळीशी
सुना साऱ्या कुढतात
घुसफूस करितात

माझी सखी वेगळीच
विदुषी ती खरोखरी
प्रगल्भशा तिच्या मनीं
अतृप्तीचा नाहीं कण

समर्थांचें लीनपण
दुर्बलांचें दीनपण
फरक जो दोहोंमध्यें
तोच तुम्हां आम्हांमध्यें

आदिशक्ति माझी सखी
कळे माझें मलाच तें
नका पुसूं–तुम्हां सारें
सांगुनी ना पटायचें

बोले स्वारी ऐकुनियां
झालें मनीं धन्यधन्य
माझ्या साऱ्या पुण्याईचें
आज होई खरें चीज

ता. १६-७-५८

# कवळुनी उरीं मला

हंसतात वन्सं मला
शिकुनीही फुकटच
अबलांच्या उन्नतीचा
करिशी ना काथ्याकूट

पुसतात जाऊबाई
खुळचा कशा आम्हांवाणी ?
हक्क हवे समानसे
हाकाटी ना चुकुनीही

पडे पेंच भावजींना
म्हणतात वहिनी ग
राजकीय पक्ष किती
मान्य तुला कोणता ग ?

सांगतात मामंजीहो
देशभक्तीचेंच वारें
खेळे माझ्या कुटुंबात
लेकीसुनाही ना मागें

सासूबाईंनाहीं सार्थ
अभिमान सुपुत्रांचा
म्हणतात देशासाठीं
वनवासी सुखानें ते

कुणीं असें–कुणीं तसें
सदा मला सुनावती
आणि माझें सहकार्य
नानापरि अपेक्षिती

इकडची स्वारी मात्र
पुटपुटे कानामध्यें
मिठी माझी तोडुनियां
नाहीं कुठें जायाचें ग

रुतवुनी घट्ट घट्ट
अधरांत अधर ते
स्वारी हळु कुजबुजे
हाच तुझा मोक्ष प्रिये

कवळुनी उरीं मला
बोले स्वारी पुन्हा पुन्हा
तुझ्या वांटणीचा सारा
उचलेन मीच बोजा !

ता. १६-७-५८

# सुफलित

कवळुनी हृदयाशीं
इकडची स्वारी सांगे
खेळतिल चंद्रसूर्य
सखे तुझ्या ओटीमध्यें

नाचतिल अंगणांत
रविशशि बालरूपें
पसर ग सखे झणिं
पायघड्या सुमनांच्या

दोन गोल तेजाचे ते
तुझ्या कटिखांद्यावर
वाढतिल दिनींमासीं
व्यापतिल ब्रम्हांडही

असें तुझें सामर्थ्य ग
असें तुझें वैभव ग
येणाऱ्या त्या देवासाठीं
देव्हाराही सजव ग

सजव ग देव्हाराही
धूप आरती पेटूं दे
मंद अशा सुगंधानें
मन माझें उमलूं दे

वोपितों ग तुझ्यामध्यें
पुण्य माझें—तेज माझें
साकार त्या बनवुनी
तूंच पुन्हां मिरवावें

प्रेरणा तूं आज माझी
उद्यां बालरवीचीही
हेंच खऱ्या गृहिणीचें
सुफलित जीवन ग

ता. १६-७-५८

# चिलखत

वन्सं भावजी हो
नातें जरी नवें
ओळख आपुली
नाहीं नवी

बाळपणींचीच
जानपछान ही
होतो जेव्हां सारे
भोळे भाळे

नव्हता हो तेव्हां
गिरविला मुळीं
संसाराचा धडा
तुम्हींसुद्धां

वन्सं भावजींची
पाहिलीं मी लग्नें
खेळविलीं बाळें
अजाणतां

नव्हतें हो ठावें
तेव्हां कुणालाच
उद्यांचें हें नातें
निकटचें

वन्सं भावजींनी
सर्वांनींच मला
पाहियली सदा
जवळुनी

जाऊबाईंनीही
केल्या गुजगोष्टी
माझ्याशीं तिच्याही
लग्नापूर्वीं

नव्हतें हो ठावें
तेव्हां दोघींनाही
हवें फुलायला
एका ठायीं

लग्नाआधींची हो
वन्संची ती लाली
अजुनीही वाटे
ताजी मला

अहो गोऱ्या वन्सं
जाणतां हो तुम्हीं
किती हळवीशी
वहिनी ही

टिचकीही हळु
मारतांना कुणीं
यावें हो भरून
नयन ते

असें कोमल हो
होतें अंतर हें
निरखिलें तुम्हीं
कितीवेळां

आणि आतां तुम्हीं
बोलतां टाकून
टिपूसही नाहीं
कसें डोळां ?

नव्या नात्याचें हो
पतिप्रेमाचें हें
चिलखत माझ्या
अंगावरी !

ता. १७-७-५८

# सासुरवास

अहो गोऱ्या वन्सं
सांगूं का हो गुज ?
सासरचा जाच
रुचे मना

सूर्याचें तें ऊन
पावसाची झड
तसा सासुरवास
हवा हवा

मारतां हो इथें
उठे वळ तिथें
जाणवते तुम्हां
कळ त्याची

आपलेच दांत
आपलेच ओठ
सांगा कुठवर ?
चावतील

अर्धांगी मी तुझ्या
लाडक्या भावाची
किती वेळ दूर ?
ठेवशील

उमजतें मला
इकडची स्वारी
सासूबाईंचाही
प्राण दुजा

उसासतां मी हो
होई स्वारी म्लान
कुठवर माय ?
साहील हो

सुखवाया पुत्रा
हंसवाल मला
होईल आनंद
चहूंकडे

ता. १७-७-५८

# महिमा वर्णाया

वर्णियेलें कशा
वन्सं जाऊबाई
भावजी मामंजी
सासूबाई

गुंफुनियां शद्बीं
केलें 'अक्षर' त्यां
रंगविलीं चित्रें
हुबेहूब

भावजींचा बाळ
वन्संचाही छोटचा
चमकला माझ्या
कवनांत

नाहीं रेखाटली
इकडची स्वारी
होईना त्याविण
कथा पुरी

ठेवियलीं कांहीं
पानें राखुनी हीं
चित्रा यथार्थ
करावया

सुचेना हो शद्ब
खुंटली हो गति
वर्णावें हो कसें ?
पतिप्रेम

अनुक्रम ७७ २४४९३ ...... वि: ......
क्रमांक ...................... नों: दि: ..
१४२५

प्राजक्ताचा वास
अमृताची रुचि
शब्दरूप कशी ?
करावी हो

नर्तन लाटांचें
चंद्राचें चांदणें
डोलतें का कधीं ?
तालावर

पतिप्रेमाचा तो
महिमा वर्णाया
लेखणी ही माझी
असमर्थ

सान्निध्य स्वारीचें
लाभो जन्मोजन्मीं
प्रार्थना ही माझी
मनोमन

सहजींच एक
सांगू द्या हो मला
पतिदेव माझा
अप्रतिम

अप्रतिम रूप
अप्रतिम गुण
अप्रतिम तेज
खरोखरी !

ता. १७-७-५८

# वारेमाप

वन्सं भावजीही
प्रिय प्राणांहुनी
सासूसासरे ते
तीर्थरूप

जाऊबाई सखी
जीवाभावाची ती
बाळालाही त्याच्या
लळा माझा

घातलें स्वारीनें
पदरांत माझ्या
पतिप्रेमाचें हो
दान चोख

समृद्ध मी अशी
उधळितें मुदें
माया तुम्हांवरी
वारेमाप

ता. १७-७-५८

# पहिला वहिला अनुभव

सांगा मोठ्या वन्सं
सांगा गोऱ्या वन्सं
सांगा जाऊबाई
सांगा मला

सांगा आठवुनी
नव्यानेंच मला
तुमचाहि कसा ?
मधुचंद्र

बरें नका सांगूं
पुसा तरी मला
पहिला वहिला
अनुभव

पाहियली जधीं
स्वारी एकांतांत
वाटे देव्हाऱ्यांत
शिरलें मी

विठोबानें खाल्ला
नैवेद्य नाम्याचा
तीच अनुभूति
पुन्हां मला

समजेना कसा ?
वाटेनाही खरें
माझा मलाच हा
चमत्कार

साधाभोळा नाम्या
देव सर्वव्यापी
भक्तीभावें वश
निमिषार्धीं

नाम्याची ती दिव्य
प्रचीति ऐकुनी
घालती तोंडांत
बोटें सर्व

भोळ्या नाम्याची ती
धांदल भाबडी
माझ्याही वांटयाला
तंतोतत

भोळा नाम्या जसा
भारला हो पुरा
विठोबाच्या नामें
मीही तशी

झालें एकरूप
पतिदेवाशीं मी
उरलें ना मुळीं
वेगळी हो

स्वारीचें हें असें
'देवपण' तुम्हां
सांगुनीही कसे ?
पटेना हो !

ता. १८-७-५८

# तापलेलें रक्त

इकडची स्वारी
पुसे पुन्हा पुन्हा
झाली कशी तूं ग
वेगळीच ?

रमलीस कशी ?
माझ्या माणसांत
माहेरची ओढ
लागेना का ?

छेडावया तुला
इथें तोंडें किती
राजाराणीचेंच
नाहीं राज्य

शिणलीस का ग ?
सांग सखे झणिं
जाऊं कुठें तरी
दूरदूर

लपवुनी तोंड
स्वारीच्या कुशींत
विचारतें तुम्हां
कळेना का ?

कवळिली जेव्हां
उरीं पहिल्यांदा
तापल्या हो नसा
माझ्या साऱ्या

तापलेलें रक्त
निवतांना पुन्हा
वाहे तालावर
        पतीच्याच

नातीं गोतीं सारीं
जीं जीं तुमचीं हो
तींच आतां मला
        जवळचीं !

ता. १८-७-५८

# होई भास

बोलतात सासूबाई
कांहींतरी ठसक्यांत
क्षणभर होई भास
स्वर घुमे स्वारीचाच

हंसतात गोऱ्या वन्सं
डोळे मिचकावुनी गोड
क्षणभर होई भास
स्वारीचेंच हंसणें हें

रुसतात मोठ्या वन्सं
आंठ्या भालीं चढवुनी
क्षणभर होई भास
स्वारीचेंच रागावणें

भावजींचें गाणें सदा
घेती ताना पुन्हा पुन्हा
क्षणभर होई भास
स्वारीचीच लकेर ही

मामंजींचा चाले वाद
बाहेरच्या सोप्यामध्यें
क्षणभर होई भास
स्वारीचाच आवेश हा

भावजींची चकमक
उडे जाऊबाईंपाशीं
क्षणभर होई भास
स्वारीचेंच कावणें हें

चिमण्या ह्या वन्सं छोटचा
बोलतात लाडें लाडें
क्षणभर होई भास
स्वारीचेंच लाघव हें

भावजींचा बाळ उरीं
बिलगुनी देई पापी
क्षणभर होई भास
स्वारीचेंच मार्दव हें

स्वारीचेच रूपगुण
छाया त्यांच्या चहूंकडे
म्हणुनी हें सासरही
रुचे मला खरोखर

पतीसवें प्रिय सारीं
सासरचीं माणसें हीं
समजेना स्वप्नांतही
कसा सासुरवास खुपे ?

ता. १८–७–५८

# अशा भाग्यासाठीं

पतिप्रेमामध्यें
नाहीं कुठें उणें
तरी बेचैन हें
मन माझें

हवा पाठीवर
सासूचा तो कर
खऱ्या ममतेनें
भिजलेला

हवी प्रगटाया
मामंजींच्या नेत्रीं
वत्सलता गाढ
अकृत्रिम

हवा जाणवाया
वन्संच्याही शद्बीं
जिव्हाळा तो सख्ख्या
बहिणीचा

हवें वाटायला
भावजींना सदा
वहिनी भूषण
घराचें हें

हवा घालायला
गळ्यामध्यें गळा
जाऊबाईच्याही
नेहमींच

हवा शिरायला
कुशींत ह्या माझ्या
भावजींचा बाळ
निःसंकोच

हवें बिलगाया
वन्संनीं ह्या छोट्या
येतां जातां मला
उगाचच

हवें वाखाणाया
सानथोरांनींही
लक्ष्मी ही घरीं
अनायासें

हवें म्हणायला
स्वारीनेंही जरा
काढ ना ग वेळ
माझ्यासाठीं

खऱ्या ममतेच्या
ओघामध्यें मला
पाहुनि खुलावें
स्वारीनेंही

लटकाच कोप
दावुनि पुसावें
विसरशी का ग ?
पतीलाही

अशा भाग्यासाठीं
झुरतें मी मनीं
लाडकी पतीची
असुनीही

ता. १९-७-५८

# भरलेल्या घरीं

मुठींत हो माझ्या
इकडची स्वारी
परि वाटे नाहीं
राम ह्यांत

बोलेना ही सासू
घालून पाडून
कौतुकही कधीं
उमटेना

माझ्या सान्निध्यांत
वन्सं भावजीही
होती निःशद्बच
एकाएकीं

मामंजीही मूक
सदा स्थितप्रज्ञ
वाटे कशी सून ?
समजेना

छोटचा वन्संची ती
किलबिल थांबे
लागतांच माझी
चाहूल हो

भावजींचा बाळ
पळे कोपऱ्यांत
जणूं आली त्याची
मास्तरीण

जाऊबाईंचाही
पडे चेहरा हा
वाटे आली घरीं
पाहुणीच

शांत झालें सारें
वातावरण हें
निवळलें जुनें
वादळ तें

नुरे झंझावात
पूर्वीचा तो मोठा
नाहीं बरसात
मायेचीही

नाहीं छेडिला मी
विसंवादी सूर
उगाच का दूर
पळतां हो ?

नको सक्तीचा हा
असा रामराम
बरवा त्याहून
वैरभाव

जिंकिली मी पुरी
इकडची स्वारी
[illegible]र वाटेना हो
राम त्यांत

भुकेली मी तुम्हां
सर्वांच्या मायेची
त्यावीण पोरकी
खरोखरी

भरलेल्या घरीं
एकाकिनी अशी
नका ठेवूं मला
उगाच हो

ता. १९-७-५८

# अमृताची वाणी

नका सासूबाई
नका लोटूं दूर
आवडती जरी
पतीची मी

आहे जन्मभर
स्वारीचा आधार
हवी चौघडी ती
तुमचीही

पतिपत्नीचें हें
नातें सनातन
आहे ठावें मूक
प्राण्यांनाही

कुठवर मानूं ?
त्याचा अभिमान
सांगा तुम्हीं वन्सं
जाऊबाई

सासूबाई वन्सं
दीर मामंजीही
नसतात मूक
प्राण्यांना हो

चौऱ्यांएेशीं लक्ष
फिरुनियां योनी
मानवी हा देह
लाभला हो

अमृताची वाणी
तुम्हां आम्हांपाशीं
उगाच का विष
कालवावें ?

बोला बोला वन्सं
घडीभर गोड
निर्मल हें नातें
खरोखर

भावजी हो ठेवा
तुम्हींही जाणीव
वहिनी ही पूज्य
मातेपरि

जाऊबाई तूं मी
जणूं दोन वाती
समईंत एका
तेवणाऱ्या

हवें उजळाया
भुवन हें सारें
दोघींनीं आपण
जोडीनें ग

ह्याच वातींनीं ग
हवीं पेटवाया
लाख निरांजनें
कुळांत ह्या

वाढवाया वंश
भूषवाया कुळ
जीवन ज्योति ह्या
आपुल्या ग

ता. १९-७-५८

# पर्याय

पतिपत्नीचें हें
नातें सनातन
आहे ठावें मूक
प्राण्यांनाही

पशुपक्ष्यांमध्यें
फळाफुलांमध्यें
सृजनाची ओढ
स्वाभाविक

ओढीमध्यें ह्याच
दिव्यत्वाचा अंश
मांगल्याचा ठसा
उमटतो

मुळांतच दिव्य
अलौकिक असें
कांहींतरी दिसे
मीलनां

असें कांहीं तरी
सर्वांभूतीं वसे
सर्व ठायीं आहे
चिरंतन

सर्वव्यापी जें तें
लाभतांना मला
प्रगटला दिव्य
तेजोलोळ

असा तेजोल्लोळ
पिवुनी मी आतां
झालें खरोखर
तेजस्विनी

तेजाची ह्या माझ्या
येईल हो उद्यां
प्रचीति ती दिव्य
तुम्हांलाही

नका सासूबाई
नका मानूं गर्व
तुमच्या पुत्राचें
तेज सारें

नाहीं कांहीं एक
स्वारीचेंच फक्त
जें जें आहे तें तें
दोघांचेंही

वगळुनी मला
कवळणें त्यांना
अशक्य हो खुद्द
मातेलाही

सासूबाई धरा
मलाही पोटाशीं
हाच पर्याय हो
स्वीकारावा

ता. १९-७-५८

# असें हवें घर

असें हवें घर
जिथें चतकोर
भाकरही खावी
आनंदांत

असें हवें घर
जिथें चंद्रमौळी
झोंपडीही डुले
समाधानें

असें हवें घर
जिथें अतिथीचें
सहर्ष स्वागत
होई सदा

असें हवें घर
जिथें सानथोर
उघडती मन
निःसंकोच

असें हवें घर
जिथें भाऊ भाऊ
पांडवांच्या परि
सलोख्यानें

असें हवें घर
जिथें सासू सून
मायलेकींहून
जवळचीं

असें हवें घर
जिथें जावा जावा
परस्परांसाठीं
झटतात

असें हवें घर
जिथें सासराही
म्हणे सुना माझ्या
देवताच

असें हवें घर
जिथें नवजात
अर्भकास मान
‘ राजा ’ परि

असें हवें घर
जिथें सुख शांति
जोडीनें नांदती
सचोटीनें

ता. २१-७-५८

# असें नको घर

असें नको घर
जिथें पक्वान्नेंही
लागावीं बेचव
मायेविण

असें नको घर
जिथें प्रासादही
काळवंडे तीव्र
कलहानें

असें नको घर
जिथें अतिथीला
मिळती अक्षता
वाटाण्याच्या

असें नको घर
जिथें सानथोर
कुढतात मनीं
उगाचच

असें नको घर
जिथें भाऊ भाऊ
फिरविती पाठ
परस्परां

असें नको घर
जिथें सासू सून
एकमेकींवर
कावतात

असें नको घर
जिथें जावा जावा
वैरिणीच सातां
जन्मींच्या त्या

असें नको घर
जिथें सासराही
म्हणे सुना घर
लुटतात

असें नको घर
जिथें नवजात
बाळासाठीं चाले
नियोजन

असें नको घर
जिथें संपत्ति ती
शिकविते लोभ
सर्वनाशी

ता. २१-७-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम २८४१८ विः
क्रमांक १४२५ नोंः दिः ८-२-

# असें घर माझें

असें हवें घर
असें नको घर
ऐकुनि पांडित्य
        हंसे स्वारी

        म्हणे खुळे माझ्या
        गेहीं बघशील
        हवें नको दोन्ही
                एका ठायीं

सेवावींस सखे
इथें आनंदानें
पक्वान्नें भिजलीं
        ममतेनें

        पहा पहा राणी
        इथें चमत्कार
        प्रासादही डुले
                समाधानें

नाहीं नाहीं इथें
संपत्तीचा मद
अतिथीही पूज्य
        देवापरि

        जीवघेणी शिस्त
        दिसते ना इथें
        सानथोर गृहीं
                विसावती

प्रेमळशी सासू
सासरा वत्सल
समृद्ध घरींही
लाभतात

नवजात बाळा
उरीं कवळाया
नको शिकवाया
सखे तूं ग

असें घर माझें
जिथें सुख शांति
संपत्तीही नांदे
सचोटीनें

ता. २१-७-५८

90084

# सासरची दौलत

सासूबाईंची ती
माया कशी ? माया कशी ?
सप्त सप्त पाताळांतिल
गंगा जशी

मामंजींचा माझ्यावर
लोभ कसा ? लोभ कसा ?
पाण्यानें भरलेला
मेघ जसा

मोठ्या भावजींचा
स्नेह कसा ? स्नेह कसा ?
सागराच्या तळांतिल
मोती जसा

जाऊबाईंची ती
प्रीती कशी ? प्रीती कशी ?
खोल खोल खणलेली
विहीर जशी

मोठ्या वन्संचें तें
प्रेम कसें ? प्रेम कसें ?
पदरांत झांकलेलें
माणिक जसें

इकडच्या स्वारीचा
प्रणय कसा ? प्रणय कसा ?
तेजःपुंज तळपता
सूर्य जसा

अशी माझी दौलत
सासरची–सासरची
उधळुनी नाती कधीं
संपायची

ता. २२–७–५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४४९३ वि: अ०५
क्रमांक १४२५ नों: दि: ७-२-५

REFBK-0010045
REFBK-0010045

१००४